# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ
## विद्यार्थी विकास विभाग

**RTMNU/DSD/609** **Date : 01.01.2026**

प्रति,

प्राचार्य /प्राचार्या/विभागप्रमुख,
सर्व संलग्नीत/संचालीत महाविद्यालये व पदव्युत्तर विभाग
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.

**विषय** : आंतर महाविद्यालयीन सांस्कृतिक स्पर्धा (युवक महोत्सव) **'युवारंग २०२६'** दिनांक १० ते १३ फेब्रुवारी, २०२६

**मा. महोदय/महोदया,**

संचालक, विद्यार्थी विकास विभागाद्वारे यावर्षी आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव **'युवारंग २०२६'** चे आयोजन,दिनांक १० ते १३ फेब्रुवारी,२०२६ पर्यंत करण्यात येत आहे. या महोत्सवात संगीत, नृत्य, नाटक, साहित्य व ललित कला विषयामध्ये निरनिराळ्या स्पर्धा होणार आहेत. आपणांस विनंती आहे की आपण आपल्या महाविद्यालय/विभागातून या स्पर्धांसाठी विद्यार्थी व विद्यार्थिनीची निवड करून सोबत जोडलेल्या आवेदन पत्रात त्यांचे नावे Proforma–D मध्ये **०१ फेब्रुवारी २०२६** पर्यंत **संचालक, विद्यार्थी विकास विभाग,** छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविंद्रनाथ टागोर मार्ग, नागपूर–४४० ००१ येथे पाठवावे. या महोत्सवात सहभागी होण्यासाठी विद्यापीठ विद्यार्थ्यांना TA & DA देण्यात येणार नाही. स्पर्धा **गुरूनानक भवन, कॅम्पस ते अंबाझरी रोड नागपूर येथे होतील. याची नोंद घ्यावी.**

**प्रमुख अटी :–**

१. फक्त वरिष्ठ महाविद्यालयाचेच विद्यार्थी सहभागी राहतील.
२. विद्यार्थी ३१ जुलाई, २०२५ ला २५ वर्षाचे आतील असावेत.
३. महाविद्यालयाचा एकच सहभागी किंवा चमू प्रत्येक स्पर्धेत सहभागी होवू शकेल.
४. विद्यार्थ्यांनी आपले ओळखपत्र व महाविद्यालयाचे पत्र सोबत आणावे.
५. निर्णायकांचा निर्णय हा अंतिम राहिल.
६. विद्यार्थ्यांना शिस्त पाळावी लागेल अन्यथा त्यांचा सहभाग रद्द समजण्यात येईल.
७. सर्व अधिकार आयोजकांच्या स्वाधीन राहतील.
८. विद्यार्थ्यांनी स्पर्धेच्या अर्धातास आधी हजर असणे आवश्यक राहील.

कृपया आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना या स्पर्धामध्ये सहभागी होण्यासाठी हे परिपत्रक त्यांच्या निदर्शनास आणून द्यावे. स्पर्धेचे विषय व नियमावली सोबत जोडली आहे.

आपले सहकार्य या पूर्वीही मिळाले व ते पूढेही अपेक्षित आहे. आपल्याला नूतन वर्ष सुखाचे व समृद्धीचे जावो.

**सहपत्र :**

| | | | |
|---|---|---|---|
| १. Proforma | - | A | (स्पर्धेचे वेळापत्रक) |
| २. Proforma | - | B | (विविध स्पर्धा) |
| ३. Proforma | - | C | (स्पर्धेची नियमावली) |
| ४. Proforma | - | D | (स्पर्धेचे प्रवेश पत्र |

संचालक
विद्यार्थी विकास विभाग

*PROFORMA – A*

(Established by Government of Central Provinces Education Department by No. Notification No. 513 dated the 1st of August 1923 & presently a State University governed by M.U. Act 2016)

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपुर विद्यापीठ
## राष्ट्रीय सेवा योजना

**Mobile No 9970361418 Email Id : rtmnunss@gmail.com**

डॉ. सोपानदेव पिसे
संचालक

रासेयो/सा/२०२५–२६/१८०
दिनांक २३.१२.२०२५

प्रति,
मा. प्राचार्य
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालय
नागपुर,भंडारा,गोदिंया,वर्धा

विषय – बाल लैंगिक शोषण थाबंवा POCSO कायदा समजून घेणे या विषयावरील ऑनलाईन जागरूकता कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी आमत्रंण.

सदंर्भ – F.No.21/14/NSSRD/2024-25/611-668 Date 25th June 2024

महोदय,

भारत सरकार युवा कार्य व खेल मंत्रालय रासेयो क्षेत्रिय निदेशालय, पुणे महाराष्ट्र व गोवा व साक्षी फाउंडेशन दि रकिशन प्रोजेक्ट व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपुर विद्यापीठ यांच्या वतिने २७ डिसेबंर २०२५ रोजी दु.१२ ते १:३० या वेळेत बाल लैंगिक शोषण थाबंवा POCSO कायदा समजून घेणे या विषयावरील ऑनलाईन जागरूकता कार्यक्रम आयोजन केला आहे. तरी आपणास विनंती करण्यात येत आहे की, आपल्या महाविद्यालयाचे रासेयो विद्यार्थी व रासेयो कार्यक्रम अधिकारी यांना या कार्यक्रमात आभसी पद्धती ने सहभागी होण्याचे निर्देश द्यावे. कार्यक्रमा ची इतर माहिती सोबत जोडली आहे.

ZoomLink:
https://us06web.zoom.us/j/89322033345?pwd=TzVLb0tDQ2NHU0ZtbFA2ZDVWbzYvZz09

Meeting ID : 893 2203 3345 Passcode ~: 579041

सचांलक

डॉ. सोपानदेव पिसे
सचांलक

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

(सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगष्ट, १९२३, द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## विद्यार्थी विकास विभाग

छत्रपती शिवाजी महाराज, मुख्य प्रशासकिय परिसर इमारत क्र १ महाराजबाग चौक, रविंद्रनाथ टागोर रोड नागपूर४४०००१
फो. नं. ०७१२–२५४८५८४, भ्रमणध्वनी क्र. ९८२२६४१६६१ ई–मेल dsd.rtmnu01@gmail.com;

रा.तु.म.ना.वि./सं.वि.वि./पत्र क्र.४३२ दि. १३/१०/२०२५

प्रति,

मा. प्राचार्य/विभाग प्रमुख,
संचालित/संलग्नित महाविद्यालये व सर्व शैक्षणिक विभाग,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.

विषय :– राज्यपाल कार्यालया कडून प्राप्त निर्देशानुसार "वंदे मातरम" गीताच्या १५० व्या वर्धपन दिनानिमीत्य आपण आपल्या महाविद्यालयात खालील दिलेल्या स्पर्धांचे आयोजन करून त्याबाबतचा अहवाल सादर करण्याबाबत.

महोदय/महोदया,

आज दिनांक १३ ऑक्टोबर २० २५ रोजी राज्यपाल कार्यालयाची ऑनलाईन झालेल्या सभेदरम्यान बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी आनंदमठ या कादंबरीतील "वंदे मातरम" या लिहिलेल्या गीतास ७ नोव्हेंबर २०२५ रोजी १५० वर्ष पुर्ण होत आहेत या ऐतिहासिक व सांस्कृतीक दृष्टीने महत्वाच्या घटनेच्या निमीत्ताने राज्यातील सर्व विद्यापीठांमधील सर्व महाविद्यालयांमध्ये सांस्कृतीक वादविवाद स्पर्धा व सांस्कृतीक गितगायनाच्या स्पर्धेचा कार्यक्रम दिनांक १५, १६ व १७ ऑक्टोबर पर्यंत आयोजीत करून त्याचा रिपोर्ट/अहवाल त्वरीत संचालक, विद्यार्थी विकास विभागात सादर करावा.

सांस्कृतीक वादविवाद स्पर्धेचा विषय : आजच्या तरूणाई मधील देशभक्तीची भावना कमी झाली आहे
सांस्कृतीक गीतगायनाच्या स्पर्धेचा विषय -- देशभक्ती गीत

डॉ. विजय खंडाळ
प्रभारी संचालक
विद्यार्थी विकास विभाग

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हिंसेस शासन, शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३, दिनांक १ ऑगस्ट, १९२३ द्वारा स्थापित
व महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क. ६, २०१७ द्वारा संचालित विद्यापीठ)
गुरू नानक भवन, अंबाझरी वळणमार्ग, विद्यापीठ परिसर, नागपूर- ४४००३३

**डॉ. समित माहोरे,( नोडल अधिकारी)**

**Email ID – yuvaconnect.rtmnu@gmail.com**

**भ्रमणध्वनी क. ९९२११४०५५३**


## परिपत्रक

दिनांक : ०५.१०.२०२५

प्रति,

**१. विद्यापीठ शैक्षणिक विभागांचे सर्व मा. विभागप्रमुख,**
**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ**

**२. विद्यापीठ संचालित व संलग्नित महाविद्यालयांचे मा. प्राचार्य व संचालक,**
**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर**

विषय : "Viksit Bharat Young Leaders Dialogue" (VBYLD) यांच्याव्दारे आयोजीत कार्यक्रमाकरीता विद्यार्थ्यांना सहभागी करण्याबाबत.

संदर्भ : NSSRD Pune Dated : ३० सप्टेंबर २०२५

महोदय / महोदया,

भारत सरकारच्या युवा कार्य व क्रिडा मंत्रालय, नवी दिल्ली मार्फत "Viksit Bharat Young Leaders Dialogue" (VBYLD) हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत सर्व राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक सर्व विद्यार्थी १५ ते २९ वयोगटातील युवक यांना सहभागाची संधी देण्यात येत आहे. सदर कार्यक्रम हा चार टप्यांमध्ये राबवायचा आहे ते पुढील प्रमाणे आहे.

Stage 1 (Digital): The Viksit Bharat Quiz (1st Sept. 15th Oct. 2025)
Stage II (Digital): The Viksit Bharat Essay Challenge (23rd Oct. 5th Nov. 2025)
Stage III (in person): The Viksit Bharat PPT Challenge State level (24th Nov.-8th Dec. 2025)
Stage-IV (in person): Viksit Bharat Championship at National Youth Festival at New Delhi (10th-12th January, 2026)-

कार्यक्रमाची सविस्तर माहिती संलग्न करण्यात आली आहे.

तरी आपणास सर्वांना विनंती आहे की, आपल्या विभागांमध्ये / महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना या उपक्रमांमध्ये सहभाग घेण्यासाठी प्रोत्साहित करावे.

धन्यवाद.

आपला विश्वासू,

डॉ. समित माहोरे
नोडल अधिकारी
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर

अधिक माहितीसाठी Join Whats app Group & Email पाठवण्यात येईल.
Whats app Group Link – https://chat.whatsapp.com/JdcPi5KbpNNFIqGPUS1jFL?mode=ems_copy_t
Registration Link -
https://mybharat.gov.in/quiz/quiz_dashboard/UzZIZmhEeWt6bmtzcGg1ZHQ1dWc3QT09

अतितातडीचे

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हींसेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट, १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित विद्यापीठ)

## (राष्ट्रीय सेवा योजना विभाग)

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, महाराजबाग चौक, रविंद्रनाथ टागोर मार्ग, नागपूर – ४४० ००१
ई–मेल: nsscellrtmnu@gmail.com

क्रमांक : रातुमनावि/विविवि/२५/१२५
दिनांक : ३ ऑक्टोबर, २०२५

प्रति,

१. विद्यापीठ शैक्षणिक विभागांचे सर्व विभाग प्रमुख.
२. विद्यापीठाशी संलग्नित व संचालित महाविद्यालयांचे प्राचार्य.

**विषय: विद्यापीठगीत गायनाच्या विश्वविक्रमी कार्यक्रमास उपस्थित राहाण्याबाबत.**

महोदय/महोदया,

आपणास विदीत आहे की, वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्ताने एकाच वेळी व एकाच सुरात **"या भारतात बंधूभाव नित्य वसू दे..."** या विद्यापीठ गीत गायनाचा **विश्वविक्रमी कार्यक्रम दिनांक ११ ऑक्टोबर २०२५** रोजी विद्यापीठाच्या जमनालाल बजाज प्रशासकीय भवनाशेजारी असलेल्या प्रांगणात आयोजित करण्यात आला आहे.

**प्रस्तुत आयोजित कार्यक्रमाच्या अनुषंगाने मा. कुलगुरू महोदयांच्या आदेशान्वये आपणास खालील प्रमाणे विनंती करण्यात येत आहे.**

१. आपल्या विभाग/महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांना वरील आयोजित कार्यक्रमास उपस्थित राहाण्याच्या दृष्टीने कार्यक्रमस्थळी नियोजित तारखेला सकाळी ८.३० वाजता रिपोर्टिंग करण्याबाबत सूचित करावे. तसेच कार्यक्रमास उपस्थित राहाणे सर्वांना अनिवार्य असल्याचे देखील त्यांना सूचित करावे.

२. आपणाकडे पाठविण्यात आलेल्या ऑडीयोनुसार, **"या भारतात बंधूभाव नित्य वसू दे..."** या विद्यापीठ गीत गायनाचा सराव करून, प्रस्तुत कार्यक्रमास उपस्थित राहाण्याबाबत आपल्या विभाग/महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांना सूचित करावे.

३. आपल्या विभाग/महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांकरिता आपल्या विभाग/महाविद्यालयाचा गणवेष असल्यास त्यांना कार्यक्रमाकरिता गणवेषात उपस्थित राहाण्याबाबत सूचित करावे. गणेवष नसल्यास पांढरा शर्ट/पांढरा कुर्ता किंवा औपचारिक (Formal) कपडे परिधान करून उपस्थित राहाण्याबाबत सूचित करावे.

४. प्रस्तुत कार्यक्रम दुसऱ्या शनिवारला असल्याकारणाने ज्या महाविद्यालयांना त्या दिवशी सुटी आहे, अशा महाविद्यालयातील सदर कार्यक्रमास उपस्थित राहाणाऱ्या सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दुसऱ्या कोणत्याही दिवशी भरपाई रजा संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी आपल्या स्तरावर मंजूर करावी.

# गांधी विचार संस्कार परीक्षा - २०२५

# आवाहन

सशक्त, बलशाली, वैचारिकदृष्ट्या समृद्ध व अहिंसक समाज निर्मितीसाठी अहिंसा, प्रेम, साधी राहणी व शांतीचा संदेश अखिल विश्वाला देणाऱ्या महात्मा गांधीजींचे तत्त्वज्ञान पुढील पिढीला देणे आवश्यक ठरते. संपूर्ण मानव जातीच्या कल्याणासाठी गांधीजींच्या विचारांचा प्रचार प्रसार करण्याचे काम गांधी रिसर्च फाउण्डेशन विविध उपक्रमातून अव्याहतपणे करीत आहे. सध्याच्या स्पर्धेच्या युगाने समाजाला भोगवादाने पछाडले आहे. येणाऱ्या पिढीला निसर्गानुकूल जीवनपद्धतीचा अवलंब करण्याची प्रेरणा देणाऱ्या महात्मा गांधीजींच्या विचारांवर आधारित गांधी विचार संस्कार परीक्षेद्वारे संस्था संवेदनशील व राष्ट्रप्रेमी व्यक्ती निर्माणाचे कार्य मागील १८ वर्षांपासून करीत आहे.

गांधीजींनी जीवनात अंगिकारलेले एकादश व्रत व संपूर्ण स्वराज्यासाठी सिद्ध असलेला समाज घडविण्यासाठी दिलेल्या रचनात्मक कार्यक्रमाद्वारे आत्मशुद्धीपूर्ण अहिंसक समाज घडविता येईल. गांधी विचार संस्कार परीक्षा यादृष्टीने उपयुक्त ठरते.

गेल्या १८ वर्षात अन्य देशांसह भारतातील २५ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी, शिक्षकांनी व हजारो बंदीवानांनी या परीक्षेत सहभागी होऊन गांधी विचारांना समजून घेतले आहे. **महाराष्ट्र शासनाचे परिपत्रक क्र. संकीर्ण २०१४/(२६/१४)/एसडी-६, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई दि. १२ जून २०१४ द्वारे** सर्व शाळांनी गांधी रिसर्च फाउण्डेशनच्या गांधी विचार संस्कार परीक्षेत अधिकाधिक विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे अशी सूचना केली आहे.

यावर्षीही गांधी विचार संस्कार परीक्षेत सहभागी शाळांसाठी गांधीतीर्थ स्वच्छ शाळा प्रतियोगितेचे आयोजन करण्यात येणार आहे. त्यासाठीचे माहितीपत्रक स्वतंत्रपणे सोबत जोडले आहे.

आपल्या सर्वांच्या सक्रिय सहभागाद्वारे या गांधी विचार संस्कार परीक्षा उपक्रमाला व्यापक बनविणे हे आपले दायित्व आहे. त्या अनुषंगाने आपण यात सहभागी व्हावे व आपल्या परिसरातील अन्य संस्थांपर्यंत हा उपक्रम नेण्यास सहकार्य करावे, ही विनंती.

गांधीजींच्या स्वप्नातील पूर्ण स्वराज्याची संकल्पना वास्तवात आणणाऱ्या व सामाजिक सौहार्दाच्या वाढीसाठी योजलेल्या कार्यात आपला सकारात्मक प्रतिसाद अपेक्षित आहे.

गांधी रिसर्च फाउण्डेशन
• सत्य • अहिंसा • शांती
गांधी तीर्थ, जैन हिल्स, शिरसोली रोड, पोस्ट बॉक्स नं. ११८, जळगांव - ४२५००१. (महाराष्ट्र)
दूरध्वनी क्र. ०२५७-२२६४८०१, २२६००३३; मो.: ९४०४९५५२२०, ९४०४९५५२२६;
ई-मेल: gandhiexam@gandhifoundation.net; संकेत स्थळ: www.gandhifoundation.net

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हिंसेस शासन, शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३, दिनांक १ ऑगस्ट, १९२३ द्वारा स्थापित

व महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्र. ६, २०१७ द्वारा संचालित विद्यापीठ)

गुरु नानक भवन, अंबाझरी वळणमार्ग, विद्यापीठ परिसर, नागपूर- ४४००३३

Email ID – yuvaconnect.rtmnu@gmail.com

डॉ. समित माहोरे,( नोडल अधिकारी) भ्रमणध्वनी क्र. ९९२११४०५९३


## परिपत्रक

दिनांक : ०३.१०.२०२५

प्रति,

१. **विद्यापीठ शैक्षणिक विभागांचे सर्व मा. विभागप्रमुख,**
**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ**

२. **विद्यापीठ संचालित व संलग्नित महाविद्यालयांचे मा. प्राचार्य व संचालक,**
**राष्टसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर**

विषय : भारतीय क्रिडा प्राधिकरणाच्या फिट इंडिया चळवळीच्या निर्देशानुसार "Sundays on Cycle" विशेष मोहिम राबविण्याबाबत.

संदर्भ : विद्यापीठ अनुदान आयोग यांच्याकडून प्राप्त पत्र क्रं. DO.No.F.1-1/2024 (Sports/NADA) Dated : 03rd October 2025

महोदय / महोदया,

विद्यापीठ अनुदान आयोग यांच्याकडून प्राप्त पत्रानुसार विद्यापीठ अनुदान आयोग व शिक्षण मंत्रालयाच्या सहकार्याने दिनांक ०५ ऑक्टोबर २०२५ रोजी भारतीय क्रिडा प्राधिकरणाच्या फिट इंडिया चळवळीच्या निर्देशानुसार "Sundays on Cycle" विशेष मोहिम राबवायची आहे. त्याकरिता विद्यापीठ अनुदान आयोगाकडून प्राप्त झालेले निर्दश सहपत्रासह जोडले आहे.

तरी आपणास सर्वांना विनंती आहे की, आपल्या विभागांमध्ये / महाविद्यालयांमध्ये "Sundays on Cycle" विशेष मोहिम राबवावी. तसेच आपण (Yoga, Zumba, Skipping Rope) यासारख्या Activities घेवून त्यासंबंधीचा अहवाल विद्यापीठाचे नोडल अधिकारी आणि माय भारत (My Bharat) पोर्टलवर पाठवावे.

धन्यवाद.

आपला विश्वासू,

Mahore

डॉ. समित माहोरे
नोडल अधिकारी
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हींसेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट, १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ द्वारा संचालित विद्यापीठ)

(स्वास्थ्य केंद्र)

रावबहादूर डी. लक्ष्मीनारायण परिसर, अमरावती रोड, नागपूर–४४०००१

गातुमनावि/वै/म/११७/२०२५–२०२६ दिनांक :– ०४/०९/२०२५

## अधिसूचना

विद्यापीठातील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना सूचित करण्यात येते की, विद्यापीठ स्वास्थ्य केंद्रात, लॉ कॉलेज परिसर, अमरावती रोड येथे वैद्यकीय चाचण्या संबंधी उपलब्ध असलेली उपकरणं व विशेषज्ञाद्वारं विद्यापीठातील विद्यार्थ्यांना व कर्मचाऱ्यांना आरोग्य सेवा व विशेष उपचार प्राप्त व्हावे या हेतूने दिनांक २३ मे २०२५ रोजी संपन्न झालेल्या व्यवस्थापन परिषदेने बाब क्रमांक १४४ अंतर्गत विद्यापीठ व हॉस्पिटल्स सोबत सामंजस्य करार (MOU) ला मान्यता प्रदान केली आहे. त्यानुसार विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांना वैद्यकीय तपासणीसाठी व आरोग्य सेवा प्रदान करण्यासाठी खालील प्रमाणे विशेषज्ञ डॉक्टर उपलब्ध राहतील.

| Sr no. | Specialist | Working Day and Time |
|---|---|---|
| 1 | General Medicine/Physician | Monday and Thursday 10.00 am To 2.00 pm |
| 2 | Pathologist and Path lab Technician | Tuesday and Friday 9.00 am To 1.00 pm |
| 3 | Physiotherapist | Wednesday and Thursday 10.00 am To 2.00 pm |
| 4 | Dentist and team | Wednesday and Thursday 10.00 am To 2.00 pm |
| 5 | Orthopedician | Tuesday 10.00 am To 2.00 pm |
| 6 | Opthalmologist | In requirement of ophthalmology checkup. as and when patients comes during Aditi Clinic OPD hours |
| 7 | Doctor and Paramedical staff | As required by Sports and Physical education department, and other University Departments for University events- 6 hours shift |

वरील वैद्यकीय सेवेप्रित्यर्थ विद्यापीठ कर्मचाऱ्यांकडून रु.५०/– इतके नेहमीप्रमाणे औषधी शुल्क भरावे लागेल. विद्यार्थ्यांना औषधे व वैद्यकीय सल्ला निशुल्क पुरविण्यात येईल. रक्त व इतर तपासण्या वरील समंजस्य करारा प्रमाणे सवलती दरावर पुरविण्यात येतील यासाठी शिक्षक, विद्यार्थी व कर्मचाऱ्यांवर होणारा खर्च व्ययशिर्ष तसेच (ण–४) ३३३ (इ) साधारण निधीतून वेतन मधून होईल. करिता विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आाणि शैक्षणिक विभागातील तसेच विद्यापीठ वसतीगृहातील विद्यार्थ्यांनी वरील वैद्यकीय सेवेचा लाभ घ्यावा.

मा. कुलगुरुंच्या आदेशान्वये

(डॉ. राजू हिवसे)
कुलसचिव

प्रतिलिपी माहितीकरीता अग्रेपित :

१. विद्यापीठ शैक्षणिक विभागाचे सर्व विभाग प्रमुख
२. विद्यापीठ संचालितव संलग्नित महाविद्यालयांचे सर्व प्राचार्य व संचालक
३. विद्यापीठातील सर्व अधिकारी व शाखाप्रमुख
४. विद्यापीठातील सर्व वसतिगृहांचे अधिक्षक

यांना विनंती करण्यात येते की, आपल्या अधिपत्याखालील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास वरील बाब आणून द्यावी.

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

" सेंट्रल प्रोव्हींसेस शासन शिक्षण विभागाची अधिसुचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट १९२३ द्वारा स्थापित व
महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६)
द्वारा संचालित राज्य विद्यापीठ "

नॅकद्वारा पुनर्मूल्यांकित 'अ' श्रेणी प्राप्त

**डॉ. माधवी खोडे चवरे**
(भा.प्र.से.)
कुलगुरू

Website : www.nagpuruniversity.ac.in
Email : vc@nagpuruniversity.nic.in

जमनालाल बजाज प्रशासकीय भवन, महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक परिसर,कॅम्पस चौक ते अंबाझरी टी-पाईंट मार्ग, नागपूर-४४० ०३३

<u>महत्वाचे</u>

प्रति,
प्राचार्य,
संलग्नित महाविद्यालय
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

**विषय: वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्ताने ११ ऑक्टोबर २०२५ रोजी विद्यापीठगीत गायनाच्या कार्यक्रमासंदर्भात .**

२००५ मध्ये आपल्या नागपूर विद्यापीठाला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ असे नाव मिळाले आणि "या भारतात बंधूभाव नित्य वसू दे....." याला आपण विद्यापीठ गीत म्हणून स्विकारले.

विद्यापीठ गीतामध्ये भारतीय संस्कृतीतील उदात्त मूल्यांचा गौरव केला असून राष्ट्रीय एकात्मतेची जाणीव होते. याद्वारे भारतीय संस्कृतींची महानता विषद करणे, प्रेरणा निर्माण करणे, राष्ट्राभिमान जागृत व जागत ठेवणे ही सर्व मूल्ये दिसत असून आपल्या विद्यापीठाच्या प्रत्येक विद्यार्थ्यांचे,विद्यापीठ निगडीत सर्वांचे हे प्रेरणा गीत असून शाश्वत मूल्यांचे घोषवाक्य आहे. समाज,राष्ट्र आणि मानवजातीसाठी उपयुक्त गीत असून भारतीय संस्कृतीचे प्रतिक आहे. "या भारतात बंधूभाव नित्य वसू दे....." हा शाश्वत संदेश समाजामध्ये रुजवायचा आहे.

या सर्व घटकांची महती लक्षात घेता **'विद्यापीठ गीत'** आपल्या जीवनमूल्यांचा सार आहे. हे लक्षात घेवून वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्ताने विद्यापीठाच्या शताब्दी वर्षाची गौरवशाली परंपरा अतिशय थाटात संपन्न झाल्यांनतर <u>**शनिवार ११ ऑक्टोबर २०२५ रोजी विद्यापीठाच्या जमनालाल बजाज भवन प्रांगणात**</u> राष्ट्रीय सेवा योजना विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी अध्यासन विभाग, विद्यार्थी विकास विभाग, क्रिडा व शारीरिक शिक्षण विभागाद्वारे <u>**एकाच ठिकाणी, एकाच वेळी व एकाच सुरात आपल्या विद्यापीठ गीत गायनाचा विश्वविक्रमी कार्यक्रम**</u> करण्याचे ठरले आहे. यात आपण, आपले महाविद्यालयीन प्राध्यापक-कर्मचारी, रासेयो अधिकारी, विद्यार्थी विकास अधिकारी, शारीरिक शिक्षण विभागप्रमुख यांना सहभागी करायचे असून रासेयो विद्यार्थीसमूह, इतर सर्व विद्यार्थीवर्ग यांना 'विद्यापीठ गीत' समूहगायनाच्या कार्यक्रमात आपण महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी, कर्मचारी वर्ग सहभागी होवून राष्ट्र घडविण्यास अमूल्य योगदान द्याल या अपेक्षासह नोंदणीसाठी <u>**https://yuvabharti-in/rtmnu/**</u> सहभागी होण्याचे <u>**QR Code किंवा या लिंकवर नोंदणी करून**</u> आवाहन करावयाचे आहे.

**आपल्या महाविद्यालयाद्वारे सहभागी होणाऱ्या सर्वांना डिजीटल प्रमाणपत्र देण्यात येईल आणि उपस्थितांची नोंद घेण्यात येईल. करिता सर्व प्राचार्यांनी आपल्या विद्यापीठ गीताच्या या समारोहाप्रसंगी आपल्या महाविद्यालयातील सर्वच या उपक्रमात सहभागी करून घेण्यासाठी महाविद्यालयीन स्तरावर उचित नियोजन करून राष्ट्रहित घडविण्यासाठी आपले अमूल्य योगदान द्याल या अपेक्षेसह.**

**QR Code**

डॉ.माधवी खोडे चवरे
कुलगुरू

(Established by Government of Central Provinces Education Department by No. Notification No. 513 dated the 1st of August 1923 & presently a State University governed by M.U. Act 2016)

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपुर विद्यापीठ
## राष्ट्रीय सेवा योजना

Mobile No 9970361418 Email Id : rtmnunss@gmail.com

डॉ. सोपानदेव पिसे
संचालक

रासेयो/दिंडी/२०२५–२६/१००
दिनांक १७.०९.२०२५

प्रति,
मा. प्राचार्य
रासेयो सलग्नित महाविद्यालय
नागपूर शहर

विषय : युथ कन्क्ट कार्यक्रमात सहभागी होण्याबाबत

केद्रं शासनाच्या निर्देशानुसार माय भारत विकसीत कार्यक्रमा अतंर्गत युथ कन्क्ट कार्यक्रमात कार्यक्रम मा. कुलगुरूच्या मान्यतेनुसार दि. २५ सप्टेंबर २०२५ रोजी **सकाळी १०.०० वाजता विद्यापीठ दिक्षांत सभागृह छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर महाराजाबाग चौक** येथे आयोजीत करण्यात येत आहे.

सदर कार्यक्रमा करिता आपल्या महाविद्यालयातील ०५ मुल व ०५ मुली व **कार्यक्रम अधिकारी यांना रासेयो बॅच व बनॅर** सह कार्यक्रम स्थळी **सकाळी १०.००** वाजता उपस्थित रहाण्याचे निर्देश द्यावे ही विनंती.

रजिस्ट्रेशन लीकं सोबत जोडली आहे सर्व रासेयो स्वंयसेवक व कार्यक्रम अधिकारी यांना रजिस्ट्रेशन करून द्यावे

आपला

डॉ.सोपानदेव पिसे
सचांलक

संपर्क
**डॉ.विनोद खेडकर – ९४२१५३७१२३**

Chhatrapati Shivaji Maharaj, Administrative Building, First floor opp. Maharajbag Ravindranath Tagor Road,Civil Lines Nagpur 440 001

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

## विद्यार्थी विकास विभाग

"सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट, १९२३, द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ"

छत्रपती शिवाजी महाराज, मुख्य प्रशासकिय परिसर इमारत क्र २ महाराजबाग चौक, रविंद्रनाथ टागोर रोड नागपूर ४४०००१
फो. नं. ०७१२–२५४८५८४ मोबाईल नं. ९४२३१४८७७९ ई-मेल dsd@nagpuruniversity.ac.in; sp.rtmnu@gmail.com


क्र.रातुमनावि/सं.वि.वि./२०२२/704.

दि. ०६/०२/२०२३

प्रति,
मा. विभाग प्रमुख/ प्राचार्य
सर्व पदव्युत्तर शैक्षणिक विभाग/संलग्नित/संचालित महाविद्यालये,
रा. तु. म. नागपूर विद्यापीठ, नागपूर.

**विषय :– आय.एल.एस. विधी महाविद्यालय, पुणे आयोजित राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेबाबत..**

महोदय,

उपरोक्त विषयांकित व संदर्भांकित पत्रानुसार आपणांस कळविण्यात येते की, आय.एल.एस. विधी महाविद्यालय, पुणे तर्फे आयोजित राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन **'वक्तृत्व स्पर्धा' शुक्रवार, दिनांक १० फेब्रुवारी २०२३** रोजी **सकाळी ०९:०० वाजता, आय.एल.एस. विधी महाविद्यालय, लॉ कॉलेज रोड (चिपळूणकर रोड) पुणे,** येथे आयोजीत करण्यात आलेली आहे. तसेच उपरोक्त स्पर्धेबाबत जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना माहिती देण्यात यावी, आणि आपल्या महाविद्यालयाचा संघ उपरोक्त स्पर्धेमध्ये सहभाग घेण्याकरीता पाठवावा.

धन्यवाद.

आपला विश्वासू

(डॉ. मंगेश पाठक)
संचालक,
विद्यार्थी विकास विभाग

**सहपत्र : आय.एल.एस. विधी महाविद्यालय, पुणे, यांचे पत्रासोबत स्पर्धेचे विषय, नियम व अटी ई. सर्व माहितीसाठीचे पत्रक जोडले आहे.**

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

## विद्यार्थी विकास विभाग

"सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगष्ट, १९२३, द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ"

छत्रपती शिवाजी महाराज, मुख्य प्रशासकिय परिसर इमारत क्र २ महाराजबाग चौक, रविंद्रनाथ टागोर रोड नागपूर ४४०००१
फो. नं. ०७१२–२५४८५८४ मोबाईल नं. ९४२३१४८७७१ ई–मेल dsd@nagpuruniversity.ac.in; sp.rtmnu@gmail.com


क्र.रातुमनावि/सं.वि.वि./२०२२/669.

दि. २४/०१/२०२३

प्रति,
मा. विभाग प्रमुख/ प्राचार्य ,
सर्व पद्व्युत्तर शैक्षणिक विभाग/संलग्नित/संचालित महाविद्यालये,
रा. तु. म. नागपूर विद्यापीठ, नागपूर.

विषय :– दिनांक २६ जानेवारी ते १० फेब्रुवारी, २०२३ या कालावधीत लोकशाही पंधरवडा साजरा करण्याबाबत.

संदर्भ :–कार्यलयीन पत्र क्र. रानिआ/माजअ–२०२२/प्र.क्र.१/का.१०, दिनांक १८ जानेवारी, २०२३...

महोदय,

उपरोक्त विषयांकित व संदर्भांकित पत्रानुसार आपणांस कळविण्यात येते की, राज्य निवडणूक आयोग, मुंबई, महाराष्ट्र यांच्या आदेशानुसार लोकशाही पंधरवडा साजरा करण्यात येतो. लोकशाही, निवडणूक व सुशासन या विषयावर जनजागृती करणे हा या पंधरवडयाचा उद्देश आहे. सदर पंधरवडा यावर्षी मोठया प्रमाणावर व्हर्च्युअल स्वरूपात साजरा करण्याचा राज्य निवडणूक आयोगाचा मानस आहे. त्यासाठी राज्य निवडणूक आयोगाच्या विविध सोशल मीडिया हॅण्डलवरून विविध स्वरूपाच्या पोस्ट/जनजागृती करण्यात येणार आहे. त्यासाठी आपण आपल्या स्तरावरून आयोगाच्या सर्व हॅण्डल्सवर आयोगाला फॉलो करावे.

उपरोक्त मोहिमेची माहिती आपण आपल्या विभागाच्या/महाविद्यालयाच्या अधिकाधिक विद्यार्थ्यांना करून दयावी. करीता माहितीस्तव सादर.

आपला विश्वासू

(डॉ. मंगेश पाठक)
संचालक,
विद्यार्थी विकास विभाग

सहपत्र : राज्य निवडणूक आयोग, मुंबई, महाराष्ट्र यांचे पत्र सोबत जोडले आहे.

(Established by Government of Central Provinces Education Department by No. Notification No. 513 dated the 1st of August 1923 & presently a State University governed by M.U. Act 2016)

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपुर विद्यापीठ
## राष्ट्रीय सेवा योजना

**Mobile No 9970361418 Email Id : rtmnunss@gmail.com**

---

डॉ.सोपानदेव पिसे
संचालक

रासेयो/विशि/२०२४–२५/८९
दिनांक १०.०१.२०२५

प्रति,
मा. प्राचार्य
रासेयो सलग्नित महाविद्यालय
नागपूर भंडारा, गोंदिया व वर्धा जिल्हा

**विषय :– राष्ट्रीय सेवा योजना स्वंयसेवकांना जलसमस्या व उपायांविषयी सामाजीक जागरूकता आणि करीयर निर्माण करण्यासाठी संधी, या उद्देशाने WATER GENIUS स्वंय जागृती से विश्व जागृती परिक्षेचे आयोजन करण्याबाबत.**

महोदय,

पाणी हे जीवन आहे आणि आजही सामान्य जनतेमध्ये जलसमस्या आणि त्याच्या उपायांविषयी पुरेशी जागरूकता नाही. लहान मुलांपासून ते प्रौढांपर्यत जलसमस्या निराकरणावर योग्य शिक्षण आणि मार्गदर्शन देणे आवश्यक आहे. भविष्यात या भीषण समस्येवर उपाययोजना म्हणुन, नटराज निकेतन संस्था, सम्विद इटरनॅशनल प्रा. लि. साइन्स एण्ड टेक्नॅालॉजी ग्रुप आणि वॉटरशॉपी वर्ल्डवाइड यांनी ०१ फेब्रुवारी २०२५ रोजी विविध स्तरावर WATER GENIUS स्वंय जागृती से विश्व जागृती परिक्षेचे आयोजन केले आहे.WATER GENIUS स्वंय जागृती से विश्व जागृती ही संकल्पना नटराज निकेतन संस्था द्वारा जलतज्ञ श्री. मुकुंद विलास पात्रीकर याची असून जागरूक नागरीक बनवणे त्यासोबतच शाश्वत विकास हा या परिक्षेमागील उद्देश आहे. या द्वारे WATER EXPERT म्हणून पाणी समस्या आणि त्यवरील उपाययोजना करीयर निर्माण करण्याची उत्तम संधी आहे.

रासेयो वगळता इतर विद्यार्थ्यांना परिक्षेचे एकुण शुल्क २९५/– रू. असले तरी **राष्ट्रीय सेवा योजना स्वंयसेवकांना ही परिक्षा निशुल्क असुन परिक्षा दि. ०१ फेब्रुवारी २०२५ ला सकाळी १०:०० ते ११:३० दरम्यान आपले मोबाईल द्ववारे ऑनलाईन घेण्यात येणार आहे. परिक्षेचे माध्यम इंग्रजी असून परिक्षेचे कालावधी ९० मिनिटाचा राहील. १०० प्रश्न १०० गुणांसाठी (प्रत्येक प्रश्नसाठी ०१ गुण) अशे स्वरूप राहील.**

प्रत्येक सहभागीला प्रमाणपत्र तसेच प्रतिष्ठीत पदक मिळणार असून,गुणापुक्रमें सुवर्ण, रैप्य, आणि कास्य पदक दिले जातील. सहभगी रासेयो विद्यार्थीची यादी natrajniketansanstha@gmail.com या मेल वा मो.नं.९०४९११६६३३ या व्हॅाटसअप नबंर वर पाठवयाची आहे. नोदंणीची अतिम तारीख **२८ जानेवारी २०२५ पर्यत** राहील. रासेयो विद्यार्थीची यादी वरील मेल वा मोबाईल वरती पाठविण्यात यावी. परिक्षेचा युजर आयडी विद्यार्थ्यानी दिलेला मो. नबंर राहील

या व्यतिरीक्त महाविद्यातील प्राध्यपक व कर्मचारी तसेच राष्ट्रीय सेवा योज़ना स्वंयसेवक वगळता इतरानां द्यायची असल्यास रजिस्ट्रेशन लिंक www.natrajniketan.org या नोदंणी करून स्वतंत्र पध्दतीने परिक्षा द्यावी लागेल. यासाठी परिक्षा शुल्क रू २९५ /– भरून परिक्षेत सहभागी होता येईल.

| SR No. | College Name | NSS Student Name | Class | MO.NO. | District |
|---|---|---|---|---|---|

आपला विनीत

(डॉ. सोपानदेव पिसे)
संचालक

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ
## विद्यार्थी विकास विभाग

**RTMNU/DSD/654** **Date : 13.01.2025**

प्रति,

प्राचार्य / प्राचार्या / विभागप्रमुख,
सर्व संलग्नीत / संचालीत महाविद्यालये व पदव्युत्तर विभाग
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.

**विषय** : आंतर महाविद्यालयीन सांस्कृतिक स्पर्धा (युवक महोत्सव) **'युवारंग २०२५'** दिनांक १० ते १३ फेब्रुवारी,२०२५

**मा. महोदय/महोदया,**

संचालक, विद्यार्थी विकास विभागाद्वारे यावर्षी आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव **'युवारंग २०२५'** चे आयोजन दिनांक १० ते १३ फेब्रुवारी,२०२५ पर्यंत करण्यात येत आहे. या महोत्सवात संगीत, नृत्य, नाटक, साहित्य व ललित कला विषयामध्ये निरनिराळया स्पर्धा होणार आहेत. आपणांस विनंती आहे की आपण आपल्या महाविद्यालय/विभागातून या स्पर्धांसाठी विद्यार्थी व विद्यार्थिनीची निवड करून सोबत जोडलेल्या आवेदन पत्रात त्यांचे नावे Proforma–D मध्ये **०५ फेब्रुवारी २०२५** पर्यंत **संचालक, विद्यार्थी विकास विभाग,** छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविंद्रनाथ टागोर मार्ग, नागपूर–४४० ००१ येथे पाठवावे. या महोत्सवात सहभागी होण्यासाठी विद्यापीठ विद्यार्थ्यांना TA & DA देण्यात येणार नाही. स्पर्धा **गुरूनानक भवन, कॅम्पस ते अंबाझरी रोड नागपूर येथे होतील. याची नोंद घ्यावी.**

**प्रमुख अटी :–**

१. फक्त वरिष्ठ महाविद्यालयाचेच विद्यार्थी सहभागी राहतील.
२. विद्यार्थी ३१ जुलाई, २०२४ ला २५ वर्षाचे आतील असावेत.
३. महाविद्यालयाचा एकच सहभागी किंवा चमू प्रत्येक स्पर्धेत सहभागी होवू शकेल.
४. विद्यार्थ्यांनी आपले ओळखपत्र व महाविद्यालयाचे पत्र सोबत आणावे.
५. निर्णायकांचा निर्णय हा अंतिम राहिल.
६. विद्यार्थ्यांना शिस्त पाळावी लागेल अन्यथा त्यांचा सहभाग रद्द समजण्यात येईल.
७. सर्व अधिकार आयोजकांच्या स्वाधीन राहतील.
८. विद्यार्थ्यांनी स्पर्धेच्या अर्धातास आधी हजर असणे आवश्यक राहील.

कृपया आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना या स्पर्धामध्ये सहभागी होण्यासाठी हे परिपत्रक त्यांच्या निदर्शनास आणून द्यावे. स्पर्धेचे विषय व नियमावली सोबत जोडली आहे.

आपले सहकार्य या पूर्वीही मिळाले व ते पुढेही अपेक्षित आहे. आपल्याला नूतन वर्ष सुखावे व समृद्धीचे जावो.

**सहपत्र :**

| | | | |
|---|---|---|---|
| १. Proforma | - | A | (स्पर्धेचे वेळापत्रक) |
| २. Proforma | - | B | (विविध स्पर्धा) |
| ३. Proforma | - | C | (स्पर्धेची नियमावली) |
| ४. Proforma | - | D | (स्पर्धेचे प्रवेश पत्र) |

संचालक
विद्यार्थी विकास विभाग

(Established by Government of Central Provinces Education Department by No. Notification No. 513 dated the 1st of August 1923 & presently a State University governed by M.U. Act 2016)

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपुर विद्यापीठ
## राष्ट्रीय सेवा योजना

Mobile No 9970361418 Email Id : rtmnunss@gmail.com

डॉ.सोपानदेव पिसे
संचालक

रासेयो/विशि/२०२४–२५/७१
दिनांक १८.११.२०२४

प्रति,
मा. प्राचार्य
रासेयो सलग्नित महाविद्यालय
नागपूर भंडारा, गोंदिया व वर्धा जिल्हा

विषय : विशेष शिबिर २०२४--२५ आयोजना बाबत

महोदय,

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर, राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतिने सत्र २०२४--२५ मध्ये रासेयो विशेष शिबिर आयोजना करिता सोबत जोडलेल्या यादी मध्ये सहभागी महाविद्यालयाच्या वतिने विशेष शिबिर आयोजन प्रस्ताव प्राप्त झाले आहे. सदर महाविद्यालयाना विशेष शिबिर आयोजनास अनुमति प्रदान करण्यात येत आहे. शिबिर आयोजन कालावधी मध्ये किंवा सथ्ळ मध्ये बदल असल्यास शिबिर आयोजीत करण्याच्या आधी रासेयो विभागात कळवावे.

या वर्षी करीता विशेष शिबिर करीता विषय खलील प्रमाणे आहे.

**(i) Youth for My Bharat**

**(ii) Youth for Digital Literacy**

आपला विनीत,

(डॉ. सोपानदेव पिसे)
संचालक

(Established by Government of Central Provinces Education Department by No. Notification No. 513 dated the 1st of August 1923 & presently a State University governed by M.U. Act 2016)

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपुर विद्यापीठ
## राष्ट्रीय सेवा योजना

**Mobile No 9970361418 Email Id : rtmnunss@gmail.com**

डॉ. सोपानदेव पिसे
संचालक

रासेयो/नोशु/२०२४–२५/९१
दिनांक १५.०१.२०२५

प्रति,
मा.प्राचार्य
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालय
नागपूर, भडांरा, गोंदिया, वर्धा

**विषय : सत्र २०२४–२५ चे रासेयो स्वंयसेवक म्हणुन प्रवेश घेतांना स्वयंसेवक कडुन घेतलेला प्रवेश शुल्क १०रू, रासेयो खात्यात वळते करण्याबाबत.**

महोदय,

रासेयो राज्य सल्लागार समितिच्या निर्देशानुसार रासयो मध्ये स्वंयसेवक म्हणुन प्रवेश घेतांना अकारण्यात येणारे प्रवेश शुल्क दर वर्षी रू. १०/– प्रति विद्यार्थी, हे सबंधित महाविद्यालय विद्यार्थ्याकडून गोळा करतात.

त्यानुसार आपणास विनंती करण्यात येते की **रासेयो स्वंयसेवक म्हणुन प्रवेश घेतांना स्वयंसेवक कडुन प्रवेश शुल्क १०रू. घेऊन** Director NSS RTM Nagpur University या नावे धनादेश द्ववारे किंवा बॅक ऑफ बडौदा, सिताबर्डी शाखा खाता क्र.०४६७०२००००००८४, IFSC& BARB0SITABU या खात्यात वळते करावे. **व त्या सबंधित माहीती कार्यलयाला सादर करावी.**

आपला विनीत,
(डॉ. सोपानदेव पिसे)
संचालक

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

## विद्यार्थी विकास विभाग

"सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन शिक्षणविभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक ४ ऑगस्ट, १९२३, द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६) द्वारासंचालित राज्य विद्यापीठ"

छत्रपती शिवाजी महाराज, मुख्य प्रशासकिय परिसर इमारत क्र २ महाराजबाग चौक, रविंद्रनाथ टागोर रोड नागपूर ४४०००१
फो. नं. ०७१२-२५४८५८४ मोबाईल नं. ९८२२६४९३३१ ई-मेल dsd.rtmnu01@gmail.com


क्र.रातुमनावि/स.वि.वि./ 676. दि. १७/०१/२०२५

प्रति,

विभागप्रमुख/प्राचार्य/संचालक,
सर्व विभाग, संचालित व संलग्नित महाविद्यालये,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठ, नागपूर.

**विषय :–एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणे येथे ८, ९ आणि १० फेब्रुवारी २०२५ रोजी नियोजित भारतीय छात्र संसद (भारतीय विद्यार्थी संसद) च्या १४ व्या वार्षिक राष्ट्रीय संमेलनात सहभागी होण्यासाठी सहकार्यासाठी नम्र विनंती.**

महोदय,

उपरोक्त विषया बाबत कळविण्यात येते की, भारतीय छात्र संसद (BCS) चे १४ वे वार्षिक राष्ट्रीय संमेलन ८, ९ आणि १० फेब्रुवारी २०२५ रोजी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणे येथे होणार आहे. मागील वर्षाप्रमाणेच, भारतातील सर्व राज्यातील निवडक विद्यापीठातील विद्यार्थ्यांनाच ३ दिवस चाललेल्या अनेक संबंधित मुद्द्यांवर समाजाच्या विविध विभागातील अनेक दिग्गजांशी संवाद आणि चर्चा करण्याची संधी मिळेल. युथ टू यूथ कनेक्ट हा कॉन्क्लेव्हचा एक अतिरिक्त अविभाज्य घटक आहे, जो त्यांच्यामध्ये संघ बांधणीची मूल्ये रुजवतो आणि त्यांना भारतातील दूरच्या देशांतील त्यांच्या समकालीनांशी जोडण्यास मदत करतो.

या वर्षी, भारतीय छात्र संसद (भारतीय विद्यार्थी संसद) च्या १४ व्या वार्षिक राष्ट्रीय संमेलनात राजकीय व्यंगचित्र, स्किट्स, मोनो–ॲक्ट प्ले, देशभक्तीपर गाणी आणि नृत्य इत्यादी मनोरंजक संवादात्मक सत्रांचा समावेश केला आहे.

करिता आपल्या महाविद्यालय/विभागातील सुचना फलकावर संबधित राष्ट्रीय संमेलनाची बाब लावुन विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देण्याची व्यवस्था करावी, व इच्छूक विद्यार्थ्यांना स्पर्धेमधे सहभागी होण्यास प्रोत्साहीत करावे.

इच्छूक विद्यार्थ्यांसाठी भारतीय छात्र संसद १४ व्या वार्षिक राष्ट्रीय संमेलनात सहभागी होण्यासाठी पुढील लिंक्स वापर करावा.

उमेदवारासांठी लिंक– www.bharatiyachhatrasansad.org

info@bharatiyachhatrasansad.org

डॉ. विजय खंडाळ
संचालक
प्रभारी संचालक, विद्यार्थी विकास
विद्यार्थी विकास विभाग
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हींसेस शासन शिक्षण विभागाची अधिसुचना क्र. ५१३ दिनांक १ ऑगस्ट १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (मा. कुलसचिव कार्यालय)

जमनालाल बजाज प्रशासकीय भवन परिसर, कॅम्पस चौक ते अंबाझरी टी–पॉईंट मार्ग, नागपूर – ४४० ०३३.

ई–मेल: **registrar@nagpuruniversity.nic.in**


रातुमनावि/कुस/२४/प्रोवि/ १५२ दि.०९/१२/२०२४

प्रति,

१.विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयाचे सर्व प्राचार्य व संचालक
२.विद्यापीठ संचालित महाविद्यालयाचे सर्व प्राचार्य व संचालक

विषय: राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने **Board of Apprentice Training (BOAT)** मार्फत **National Apprentice Training Scheme** ची माहीती देण्याकरीता आभासी बैठक.

महोदय,

उपरोक्त विषयांन्वये कळविण्यात येते की, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आयोजित **Board of Apprentice Training (BOAT)** मार्फत **National Apprentice Training Scheme** अंतर्गत विहित करण्यात आलेली अप्रेंटिसशिप योजना आपले महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर आणि पदविका अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांना योजनेअंतर्गत उपलब्ध असलेल्या संधी बाबत मार्गदर्शन देण्याकरिता आभासी पद्धतीने दिनांक १३/१२/२०२४ दुपारी ३.०० रोजी बैठक आयोजित केलेली आहे. या बैठकिला विद्यापीठाचे मा. प्र–कुलगुरू, मा.कुलसचिव तथा संचालक, **Board of Apprentice Training (BOAT) Western Region Mumbai**, हे मार्गदर्शन करणार आहे.

तरी आयोजित बैठकिला आपण सर्वांनी तसेच आपल्या महाविद्यालयातील इंटरशिपचे नोडल अधिकारी व प्रशिक्षण रोजगार अधिकाऱ्यांसह बैठकीस उपस्थित राहावे.

**बैठकिची लिंक खालीलप्रमाणे:**

https://rtmnu.webex.com/rtmnu/j.php?MTID=m7b7048946a62182bc050d0dd3369e461
Friday, December 13, 2024 3:00 PM | 3 hours | (UTC+05:30) Chennai, Kolkata, Mumbai, New Delhi
**Meeting number: 2515 087 9103**
**Password: 13122024 (13122024** when dialing from a video system)

-SD/-
**(डॉ.राजु हिवसे)**
कुलसचिव

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

## विद्यार्थी विकास विभाग

"सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगष्ट, १९२३, द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ"

छत्रपती शिवाजी महाराज, मुख्य प्रशासकिय परिसर इमारत क्र १ महाराज बाग चौक, रविंद्रनाथ टागोर रोड नागपूर ४४०००१ फो. नं. ०७१२–२५४८५८४ भ्रमणध्वनी क.९८२२६४९६६१ ई–मेल dsd.rtmnu01@gmail.com sp.rtmnu@gmail.com

क्र.रातुमनावि/सं.वि.वि./२०२४–२५/ 453. दि. २१/१०/२०२४

प्रति,
**मा. संचालक/विभाग प्रमुख/प्राचार्य**
विद्यापीठाचे सर्व विभाग/संलग्नित/संचालित महाविद्यालये,
रा. तु. म. नागपूर विद्यापीठ, नागपूर.

**विषय :– वाद विवाद स्पर्धेमध्ये सहभागी होण्याबाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयांकित पत्रानुसार आपणांस कळविण्यात येते की, कालीदास समिती विक्रम विश्वविद्यालय देवास मार्ग, उज्जैन यांच्या विद्यमाने **वाद विवाद स्पर्धेचे** आयोजन **१२ ते १८ नोव्हेंबर, २०२४** रोजी करण्यात आलेले आहे. तसेच या वाद विवाद स्पर्धेमध्ये भाग घेण्याची **अंतिम तारीख ११ नोव्हेंबर, २०२४** पर्यत देण्यांत आलेली आहे. याबाबतचे विवरण सोबत जोडलेल्या परीपत्रकात दिलेले आहे. करीता उपरोक्त स्पर्धेमध्ये भाग घेण्याकरीता इच्छुक विद्यार्थ्यांना माहिती देण्यात यावी. तसेच आपल्या विभाग/महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना उपरोक्त स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहीत करावे.

धन्यवाद.

आपला

(डॉ. विजय खंडाळ)
प्रभारी संचालक,
विद्यार्थी विकास विभाग

**सहपत्र : कालीदास समिती विक्रम विश्वविद्यालय, उज्जैन यांचे पत्रसोबत परीपत्रक जोडले आहे.**

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

## विद्यार्थी विकास विभाग

"सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट, १९२३, द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ"

छत्रपती शिवाजी महाराज, मुख्य प्रशासकिय परिसर इमारत क्र १ महाराज बाग चौक, रविंद्रनाथ टागोर रोड नागपूर ४४०००१ फो. नं. ०७१२–२५४८५८४ भ्रमणध्वनी क.९८२२६४१६६१ ई–मेल dsd.rtmnu01@gmail.com sp.rtmnu@gmail.com


क्र.रातुमनावि/सं.वि.वि./२०२४–२५/455. दि. २१/१०/२०२४

प्रति,
मा. संचालक/विभाग प्रमुख/प्राचार्य
विद्यापीठाचे सर्व विभाग/संलग्नित/संचालित महाविद्यालये,
रा. तु. म. नागपूर विद्यापीठ, नागपूर.

**विषय :– प्रश्नमंजूषा (Quiz) स्पर्धेमध्ये सहभागी होण्याबाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयांकित पत्रानुसार आपणांस कळविण्यात येते की, Multi Commodity Exchange of India Ltd. Mumbai यांच्या विद्यमाने **प्रश्नमंजूषा (Quiz) स्पर्धेचे** आयोजन करण्यात आलेले आहे. तसेच उपरोक्त स्पर्धेची पहिली फेरी २ डिसेंबर, ते ५ डिसेंबर, **२०२४** पर्यंत आहे. तसेच नोंदणी १ डिसेंबर, २०२४ पर्यंत खुली आहे. सदर स्पर्धेकरीता कोणतेही नोंदणी शुल्क नाही, परंतु विद्यार्थी/सहभागींनी ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक आहे.

याबाबतचे विवरण सोबत जोडलेल्या परीपत्रकात दिलेले आहे. करीता उपरोक्त स्पर्धेमध्ये सहभाग घेण्याकरीता इच्छुक विद्यार्थ्यांना माहिती देण्यात यावी. तसेच आपल्या विभाग/महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना उपरोक्त स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहीत करावे.

धन्यवाद.

आपला

22/10/24

(डॉ. विजय खंडाळ)
प्रभारी संचालक,
विद्यार्थी विकास विभाग

**सहपत्र : Multi Commodity Exchange of India Ltd. Mumbai यांचे पत्रसोबंत परीपत्रक जोडले आहे.**

(College Section)